Size : 8cm x 12cm

# दि विश्वेश्वर सहकारी बँक लि., पुणे

(मल्टीस्टेट बँक)

**मुख्य कार्यालय :** 471/472, मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे-411037.
फोन नं. : 020 24261755/24262745,
ई-मेल : **vsbl@vishweshwarbank.com** संकेतस्थळ : **www.vishweshwarbank.com**

## जाहीर सूचना

## Re-KYC अद्ययावत KYC कागदपत्रे पुन:श्च सादर करणेबाबत

बँकेच्या सर्व खातेदारांना कळविण्यात येते की, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शी सूचनांप्रमाणे आम्हाला आपल्या खात्यासाठी आपली अद्ययावत (updated) केवायसी कागदपत्रे वेळोवेळी प्राप्त करणे बंधनकारक असते. तसेच विद्यमान Prevention of Money Laundering Act, 2002 च्या तरतूदीनुसार आपल्यावर देखील केवायसी कागदपत्रे देण्याचे बंधन आहे. आपण आम्हास आमच्या मागणी अनुसार आपली अद्ययावत KYC कागदपत्रे त्वरीत सादर करावीत ही विनंती. तसेच सध्या आपण खात्यावर खातेव्यवहार करीत नसल्यास, पुन्हा आपले व्यवहार सुरु करावेत. यासंबंधी शाखास्तरावर उपलब्ध करण्यात आलेले निर्धारीत फॉर्म भरुन आम्हास सहकार्य करावे.

आम्ही आपल्याला KYC कागदपत्रांच्या पूर्ततेसाठी सदर जाहीर नोटीस-सुचना देत आहोत. आपण सदर नोटीसच्या दिनांकापासून 30 दिवसांचे आत KYC कागदपत्रांची आवश्यक ती पुर्तता करावी. Core Banking Solution System मुळे आपल्या खात्यासाठी KYC कागदपत्रांसाठीच्या देय दिनांकानंतर रिझर्व्ह बँकेच्या सूचनेप्रमाणे आम्हाला आपल्या खात्यावरील व्यवहार थांबविणे नाईलाजास्तव भाग आहे याची कृपया नोंद घ्यावी. आपली केवायसी कागदपत्रे प्राप्त होताच आपले खाते पुर्ववत केले जाईल. सदरबाबत आपला Registered Mobile क्रमांक शाखेमधे उपलब्ध असेल तर त्यावर आम्ही आपणास SMS व्दारे स्मरण देखील देत आहोत. आपला Mobile No. व E-mail ID खात्यात नोंदवावा व आपला C-KYC Registration No. प्राप्त झाल्याची खात्री करावी.

या अनुषंगाने आपले खाते 1) RE-KYC अंतर्गत KYC कागदपत्रांची मुदत संपली आहे किंवा दि. 31.03.2023 अखेर संपणार आहे तसेच अपुर्ण कागदपत्रांमुळे यापुर्वी Freeze झाले आहे 2) खात्यावर सलग दोन वर्षे खातेव्यवहार नसल्याने खाते Dormant / Inoperative झाले आहे : याबाबतची तपासणी प्रत्यक्ष शाखेमधे जाऊन करावी व योग्य ती KYC कागदपत्रे सादर करुन आम्हास आपल्या चांगल्या ग्राहक सेवेसाठी सक्रीय सहकार्य करावे. बँकेला त्यापुढे काही कार्यवाही करणे गरजेचे ठरले, तर त्यासंबंधी होणारा खर्च देखील आपल्या खात्यावर नावे टाकण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. कृपया अधिक माहितीसाठी व मार्गदर्शनासाठी आपले संबंधित शाखा व्यवस्थापक किंवा बँकेचा ग्राहक संवाद कक्ष (सेल फोन क्र. 9881909700) यांच्याशी त्वरीत संपर्क साधावा.

**श्रीराम आपटे**
मुख्य कार्यकारी अधिकारी

पुणे, दिनांक : 15.01.2023